महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ

अमरावती विभागीय मंडळ अमरावती.

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY AND HIGHER SECONDARY EDUCATION

AMRAVATI DIVISIONAL BOARD, AMRAVATI


पत्र क्र.अविमं./माप/ 3049

अमरावती दिनांक :11 /१२/२०२५.

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,

सर्व मान्यता प्राप्त शाळा/क. महाविदयालय,

अमरावती विभाग, अमरावती.

विषय:- माध्यमिक शालांत व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च- २०२६ चे खाजगी फॉर्म नं १७ बाबत.

संदर्भ:- १ रा.मं/परीक्षा-३/२६९८/पुणे, दि.३०/०७/२०२५ रोजीचे पत्र.

२.या कार्यालयाचे पत्र क्रं अविमं/माप/१०१७, दि०१/०७/२०२५ रोजीचे पत्र.

३. रा.मं/परीक्षा-८/३९४९/पुणे, दि.१७/११/२०२५ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, ज्या विदयालय व क. महाविदयालय मार्फत संदर्भ क्रं १ च्या पत्रान्वये माध्यमिक शालांत व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च- २०२६ करीता खाजगी फॉर्म नं १७ ऑनलाईन नाव नोंदणी अर्ज सादर करण्यात आलेले आहे. त्यांना सुचित करण्यात येते की, विदयालय व क. महाविदयालयाच्या लॉगीन वर काही विदयार्थ्यांचे आवेदनपत्रे त्रुटीमध्ये (Incomplete )तसेच शाळेच्या/क.महाविदयालयाच्या मान्यतेकरीता (Sent for school Approval) प्रलंबीत दिसून येत आहे. सदर आवेदनपत्र मंडळाच्या लॉगीनला (Send to Division Board) पाठविणे आवश्यक आहे. जेणे करुन खाजगी आवेदनपत्राची तपासणी करुन विदयार्थ्यांना परीक्षेचे आवेदनपत्रे सादर करण्याकरीता Enrollment No देता येईल. परंतू अदयापही काही विदयालय/क.महाविदयालयाच्या लॉगीनला अर्ज प्रलंबीत दिसून येत आहे. तरी अर्जाची पडताळणी करुन मंडळाच्या लॉगीनला पाठविण्यात (Send to Division Board) यावे. त्याचप्रमाणे खाजगी फॉर्म नं १७ विदयार्थ्यांना मंडळाकडून Enrollment No प्राप्त झाल्यानंतर परीक्षेचे आवेदनपत्र सादर करणे आवश्यक आहे. ऑनलाईन आवेदनपत्रे सादर न केल्यास विदयार्थ्याच्या शैक्षणीक नुकसानीस आपण जबाबदार राहाल.

संदर्भ क्रं ३ नूसार मंडळाच्या अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब तारखांबाबत सर्व मान्यता प्राप्त विदयालयांना/क.महाविदयालयांना कळविण्यात आलेले आहे. त्यानूसार आपणाकडून लॉगिनला असणारे प्रलंबीत अर्ज उशीरा प्राप्त झाल्यास प्रतिदीन प्रमाणे परीक्षा शुल्क आकारले जात असल्याने विदयार्थ्याच्या होणा-या आर्थिक नुकसानीस आपण सर्वस्वी जबाबदार राहाल..

तसेच या पत्राव्दारे आपणास कळविण्यात येते की, आपल्या विदयालय/क.महाविदयालयाच्या लॉगीनला खाजगी विदयार्थ्यांचे आवदेनपत्र प्रलंबित राहू नये. जेणे करुन कुठलाही विदयार्थी परीक्षेपासून वंचीत राहणार नाही. तरी सदर कारणामुळे विदयार्थी परीक्षेपासून वंचीत राहिल्यास याबाबतची सर्वस्वी जबाबदारी मुख्याध्यापक/प्राचार्य, यांची राहील.

**(डॉ.जयश्री राऊत)**

**विभागीय सचिव,**

अमरावती विभागीय मंडळ,अमरावती